







कपूर खानदानाची दुसरी पिढी: राज कपूर, शम्मी-गीताबाली आणि शशी कपूर-जेनीफर कैंडल

राम लखनमधील 'वन टू का फोर...' हे गाणं म्हणजे कपूर घराण्याचं 'थीम साँग' आहे. करिश्मा-करिना दोघी बहिणी गाण्यातील फोर म्हणजे चौथ्या पिढीतील कलावंत आहेत. या घराण्यातील वन म्हणजे पहिले कलावंत होते पृथ्वीराज कपूर. त्यांच्यापासून सुरू झालेली चित्रपट व्यवसायातील कपूर घराण्याची परंपरा आज करिश्मा, करिनापर्यंत पोहोचली आहे. थोडीथोडकी नव्हे तर सत्तर एक वर्षे. करिश्मा-करिना या दोघी उजळ माथ्याने चित्रपट व्यवसायात वावरत आहेत. पण १९२९ साली पृथ्वीराज कपूर चित्रपट व्यवसायात आले तेव्हा मात्र काळ असा उदारमतवादी नव्हता. प्रतिष्ठित घराण्यातील मुले चित्रपट व्यवसायात आली तरी कोणाला ते खपू नये, असा तो काळ सोवळा होता. पृथ्वीराज कपूर चित्रपट व्यवसायात आले तेव्हा समाज कपूर घराण्याकडे कुत्सितपणे पाहू लागला होता.

पृथ्वीराज यांचं सिनेमात येणं त्यांचे वडील बसेश्वरनाथ यांनादेखील रुचलेलं नव्हतं. पण मुलांचं आणि त्याचबरोबर नातवंडांचं सिनेमात येणं त्यांनी स्वीकारलं आणि शेवटी नातू-राज कपूरच्या *आवारा* या चित्रपटात न्यायाधीशाची छोटी भूमिका केली.

पृथ्वीराज कपूर चित्रपटात आले तो काळ मूकपटांचा होता. १९२९चा *चॅलेंज* हा त्यांनी भूमिका केलेला पहिला मूकपट. त्यानंतर काही मूकपटात त्यांनी भूमिका केल्या. १९३१चा *आलमआरा* या भारतात तयार झालेल्या पहिल्या बोलपटात भूमिका करून ते मूकपटातून बोलपटात आले. कितीतरी चित्रपटांत त्यांनी नायकाची भूमिका केली. पृथ्वीराज कपूर राज व शम्मी कपूर नायक बनल्यावरदेखील काही काळ येथे नायक म्हणून वावरत होते. पण १९५२ साली *एहसान* या चित्रपटात त्यांनीच शम्मी कपूरच्या मित्राची भूमिका केली होती. चरित्र भूमिकेकडे आपला मोर्चा वळल्यावर *आवारा, कल आज और कल*मध्ये ते राज कपूरचे बाप बनले आणि याच चित्रपटात नातू रणधीर कपूरच्या आजोबाची भूमिका करेपर्यंत रुपेरी जीवनाचा प्रवास केला.

पृथ्वीराज कपूर यांच्यानंतर चित्रपट व्यवसायात आलेले कपूर घराण्यातील दुसरे कलावंत म्हणजे त्यांचे सावत्रबंधू त्रिलोक कपूर. चित्रपटात भूमिका करीत असतानाच पृथ्वीराज नाटकात भूमिका करायचे. त्यांचा हात धरूनच त्रिलोक कपूरनी नाटकात आपल्या अभिनय जीवनाची सुरुवात केली आणि १९३३मध्ये *चार दरवेश* या चित्रपटाद्वारा ते चित्रपटात आले. *सीता* व *पागल* या चित्रपटात पृथ्वीराज कपूर यांच्याबरोबर देखील त्यांनी भूमिका केली. *हर हर महादेव*ने पौराणिक चित्रपटाची प्रतिमा त्रिलोक कपूरना दिली. पण त्याआधी ते सामाजिक चित्रपटातील एक लोकप्रिय नायक होते. १९३५च्या *वामिक अझरा*मध्ये वामिकची तर १९४७च्या *मिर्झा साहिबा*मध्ये मिर्झाची मजनू छाप भग्नहृदयी प्रियकराची

काश्मीर की कलीमध्ये बंडखोर नायक शम्मी कपूर-शर्मिला टागोर



भूमिका त्यांनी केली होती. *प्रभू का घर*, *प्यार की बात*मध्ये त्यांनी नायकाची भूमिका केली. *हर हर महादेव*नंतर मात्र ते एकदम पौराणिक चित्रपटात फेकले गेले, ते पुन्हा सामाजिक चित्रपटात आलेच नाहीत. सत्तरच्या दशकात चरित्र-अभिनेते म्हणून ते पुन्हा चित्रपटात आले.

पृथ्वीराज व त्रिलोक कपूर यांच्यानंतर कपूर घराण्यातून चित्रपट व्यवसायात आलेला तिसरा अभिनेता म्हणजे त्यांचा मावस भाऊ कमल कपूर. १९४६-४७च्या सुमारास *हातीमताई*, *डाकबंगला* या चित्रपटांद्वारा ते चित्रपट व्यवसायात आले आणि त्यानंतर काही चित्रपटात त्यांनी नायकाची भूमिका केली. आपला पुतण्या राज कपूर निर्माता-दिग्दर्शक बनतोय म्हटल्यावर त्याला प्रोत्साहन देण्यासाठी आपला नायकाचा चेहरा एका चित्रपटासाठी त्यांनी पुसून टाकला. आणि आर. के.च्या *आग* या चित्रपटात त्यांनी राज कपूरच्या पित्याची भूमिका केली. पृथ्वीराज कपूर यांच्याप्रमाणेच कमल कपूर यांच्या व्यक्तिमत्त्वातदेखील राजबिंडेपण होते. पण त्यांच्या अभिनयाची झेप काही त्यांच्यात नव्हती. पाहता-पाहता त्यांचा नायक येथे संपला आणि चरित्र व खलभूमिकांकडे आपला मोर्चा त्यांनी वळवला.

पृथ्वीराज, त्रिलोक व कमल कपूरनंतर कपूर घराण्याची नंबर टूची पिढी चित्रपट व्यवसायात आली. या पिढीतला पहिला अभिनेता म्हणजे राज कपूर. पृथ्वीराजनी मनावर घेतले असते तर आपल्या मुलाला, राजला नायक बनवण्यासाठी एखादा चित्रपट त्यांना सहजासहजी निर्माण करता आला असता. पण पृथ्वी थिएटर्स ही स्वत:ची चित्र संस्था ते चालवत होते. यामुळे राज कपूरला नायक बनवण्यासाठी ते स्वत:काही चित्रपट निर्माण करू शकले नाहीत. आपल्या ओळखीने बॉम्बे टॉकीज व केदार शर्मा यांच्याकडे त्यांनी त्याला उमेदवारी करायला लावली. त्याला पगार मिळायचा दरमहा पंच्याहत्तर रुपये. १९४३ मध्ये *हमारी बात* या चित्रपटाच्या वेळी तो अमिया चक्रवर्तींचा सहाय्यक होता. आणि या चित्रपटात प्यूनची एक छोटीशी भूमिका त्याने केली होती. *हमारी बात*च्या आधी न्यू थिएटर्सच्या *इन्कलाब* चित्रपटात तो बालकलाकार म्हणून चमकला होता.

हमारी बात पडद्यावर आल्या आल्याच राज कपूर रणजितमध्ये केदार शर्माचा सहाय्यक म्हणून दाखल झाला. आठ आणे रोजंदारीवर. तेथे पृथ्वीराज यांची नायकाची भूमिका असलेल्या *गौरी* या चित्रपटादेखील त्याने एक छोटीशी भूमिका केली होती. १९४४ मध्ये पृथ्वीराजनी मुंबईहून कोल्हापूरला जाऊन भालजी पेंढारकर यांच्या *महारथी कर्ण* व *वाल्मीकी* या दोन चित्रपटांत भूमिका केल्या. राज कपूर तेव्हा पृथ्वीराज याच्याबरोबर होता. भालजींची नजर त्याच्यावर पडली आणि त्यांनी त्याला *वाल्मीकी*त नारदाची भूमिका दिली. पृथ्वीराज या चित्रपटात वाल्मीकी होते आणि त्यांच्यासमोर नारद म्हणून उभा राहताना राज कपूरने जबरदस्त आत्मविश्वास दाखवला होता. त्याचा तो आत्मविश्वास पाहून भालजी पेंढारकर एकदम खूष झाले आणि त्यांनी त्याला या भूमिकेचे एकदम पाच हजार रुपये दिले. ती रक्कम त्याच्याकडून उधळली जाऊ नये म्हणून त्यांनी ती त्याच्याकडून आपल्या ताब्यात घेतली आणि त्या रकमेत त्याच्या नावावर चेंबूरला एक जमीन खरेदी करून ठेवली. कालांतराने राज कपूरचा आर. के. स्टुडिओ त्याच जागेत उभा राहिला. नंतर राज कपूर १९४७ मध्ये केदार शर्मा यांच्या *नीलकमल* या चित्रपटाद्वारा नायक बनला. आणि त्यानंतर वर्षभरातच आर.के. ही स्वत:ची चित्रसंस्था स्थापन करून १९४८च्या *आग* या चित्रपटाद्वारा निर्माता व दिग्दर्शक. त्यावेळी त्याचं वय अवघं चोवीस वर्षांचं होतं. इतक्या लहान वयात निर्माता-दिग्दर्शक बनलेला तो पहिलाच भारतीय कलाकार असावा. *आग*नंतर *राम तेरी गंगा मैली*पर्यंत अनेक चित्रपट त्याने आर.के.तर्फे निर्माण केले. *आवारा*ने त्याची लोकप्रियता रशियापर्यंत पोहोचवली. तो चित्रपट व्यवसायात आला तेव्हा पृथ्वीराज कपूर यांचा मुलगा ही त्याची ओळख होती. आपल्या कर्तृत्वाने तो इतका मोठा झाला की राज कपूरचे वडील ही पृथ्वीराज यांची ओळख बनली.

राज कपूरचं चित्रपट व्यवसायातील योगदान इतिहासात दखल घेतली जावी इतकं श्रेष्ठ आहे. यामुळेच १९८८ मध्ये दादासाहेब फाळके पारितोषिकाचा सन्मान त्याला लाभला. पृथ्वीराजनादेखील हा सर्वोच्च सन्मान लाभला होता, पण मरणोत्तर. आणि राज कपूर... १९८८ मध्ये फाळके पारितोषिकाचा सन्मान त्याला लाभला तेव्हा हा सन्मान स्वीकारायला आनंदातिशयाने तो दिल्लीला गेला. हा सन्मान स्वीकारल्यानंतर तो एकदम कोसळला. आणि २ जून १९८८ला दिल्लीतच त्याचं निधन झालं. पृथ्वीराजला स्वत:चं घर कधीच उभारता आलं नाही. आयुष्यभर माटुंग्याला एका भाड्याच्या घरात ते राहिले. राज कपूरने *बॉबी*नंतर स्वत:चं घर केलं. पृथ्वीराज आपल्या मुलांवर कधी भार बनले नाहीत. पृथ्वी थिएटर्स या आपल्या



तीन पिढ्यांमधला संघर्ष: कल आज और कलमध्ये पृथ्वीराज, राज आणि रणधीर कपूर



जब जब फूल खिले'ची जोडी: शशी कपूरसोबत बेबी नंदा







तिसऱ्या पिढीतले कपूरः रणधीर कपूर-बबिता, ऋषी कपूर-नीतू सिंग आणि राजीव ऊर्फ चिंपू कपूर

नाट्यसंस्थेचे चित्रपट संस्थेत रूपांतर करून १९५७ साली त्यांनी एक चित्रपट निर्माण केला. त्यात ते कर्जबाजारी झाले. चित्रपटात भूमिका करून मिळणाऱ्या पैशातून हे कर्ज त्यांनी हळूहळू फेडलं.

राज कपूरनंतर कपूर घराण्याच्या नंबर टूच्या पिढीतून चित्रपट व्यवसायात आलेला दुसरा अभिनेता म्हणजे शम्मी कपूर. हा एकमात्र अपवाद वगळता कपूर घराण्यातील अन्य कोणीही अभिनेता प्रत्यक्ष जीवनात कॉलेजची पायरी कधी चढलाच नाही.

राज कपूरप्रमाणे शम्मीदेखील पृथ्वी थिएटर्सच्या नाटकातच भूमिका करायचा. राजला आल्या आल्या चित्रपटात झटकन यश मिळालं तसं शम्मीला मिळालं नाही. १९५३ साली *जीवनज्योती* या चित्रपटात नायकाची भूमिका करून तो चित्रपटात आला. त्यानंतर १९५६पर्यंत तो आपल्या रुपेरी जीवनात कोठेतरी अंधारात चाचपडत होता. १९५७च्या *तुमसा नही देखा* या चित्रपटाने त्याला या अंधारातून बाहेर काढलं. या चित्रपटातून त्याने आकाराला होता उछलकूद करणारा एक नायक. उछलकूद करणाऱ्या त्याच्या बंडखोर नायकाचा हा चेहरा तरुण पिढीच्या एकदम जवळ जाणारा होता. या बंडखोरीत त्याने *जंगली*, *ब्लफ मास्टर*, *जानवर*, *बदतमीज* यासारखी नावे असलेल्या आपल्या चित्रपटांची एक वेगळी व शिवराळ परंपरा येथे निर्माण केली. आपल्या नायकाचा फ्रेशनेस कायम राखण्यासाठी सदैव तो नवनव्या चित्रतारकांचा शोध घेत राहिला.

राज कपूर, शम्मी कपूरनंतर कपूर घराण्याच्या नंबर टूच्या पिढीतून चित्रपट व्यवसायात उदयाला आलेला तिसरा अभिनेता म्हणजे शशी कपूर. राज कपूरहून तो चौदा वर्षांनी लहान. तरीही चित्रपट व्यवसायात त्याचा उदय मात्र राज कपूरबरोबरच झाला. १९४८चा राज कपूरचा *आग* त्याची भूमिका असलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात त्याने छोट्या राज कपूरची पंधरा मिनिटांची भूमिका केली होती. ही भूमिका त्याने शशी राज या नावाने केली. शशी कपूरने शशी राज नावाने चार चित्रपटांतच बालकलाकार म्हणून भूमिका केली.

राज कपूर, शम्मी कपूरप्रमाणेच पृथ्वी थिएटर्सच्या नाटकातदेखील शशी कपूरने भूमिका केली आणि त्यानंतर कॅंडल परिवाराच्या शेक्सपीयरने इंग्रजी नाटकातून. राज व शम्मी या दोघांनाही चित्रपटात यश मिळाल्यावर नाटकाचा विचार करायला कधी वेळ मिळाला नाही. पण शशी कपूरने मात्र चित्रपटात यश मिळाल्यावर पृथ्वीराज व पृथ्वी थिएटर्स यांची स्मृती जिवंत ठेवण्यासाठी जुहूला पृथ्वी थिएटर्स उभारलं. *जब जब फूल खिले*पासून त्याच्या लोकप्रियतेचं युग येथे सुरू झालं. पण या युगात तो केवळ हिंदी चित्रपटांचा राहिला नाही. द हाऊसहोल्डर बॉम्बे टॉकीज, सिद्धार्थ, हीट अ‍ॅण्ड डस्ट, सेमी अ‍ॅण्ड रोजी, शेक्सपियरवाला यासारख्या इंग्रजी चित्रपटात भूमिका करून तो इंग्रजी चित्रपटांचा देखील झाला. राज कपूर व शम्मी कपूर यांच्यातील अभिनेत्याचं यश फक्त फिल्मफेअर पुरस्कारापर्यंत मर्यादित राहिलं. शशी कपूरला फिल्मफेअरचं सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचं पारितोषिक कधी मिळालं नाही. *दीवार* या चित्रपटासाठी त्याला फिल्मफेअरचं सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेत्याचं पारितोषिक मिळालं. पण आपलं यश फिल्मफेअरपर्यंत मर्यादित न ठेवता तो राष्ट्रीय पारितोषिकापर्यंत पोचला. १९८६ साली *न्यू दिल्ली टाइम्स* या चित्रपटासाठी त्याला सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

*शोले*नंतर हिंदीत मल्टी स्टार कास्ट चित्रपटाचं युग आलं, या युगात शशी कपूरने स्वतःला पुरतं झोकून दिलं आणि स्वतःचं एक वेगळंच स्थान त्याने येथे निर्माण केलं. यामुळे अमिताभ बच्चनचं युग येथे सुरू झाल्यावर त्याच्याइतका दुसरा कोणीही कलावंत अमिताभसमोर ठामपणे उभा राहू शकला नाही. तो थोड्या थोडक्या चित्रपटात नव्हे तर

अकरा चित्रपटांत अमिताभबरोबर चमकला, यामुळे मल्टी स्टार कास्ट चित्रपटात त्या दोघांची जोडी त्या काळात चांगलीच जमली होती. *बंधन कच्चे धागों का*, घुंघरूपर्यंत शशी कपूर नायक म्हणून येथे वावरत होता. नंतर तो चरित्र अभिनेता बनला.

राज, शम्मी व शशी नंतर कपूर घरण्यातील नंबर थ्रीच्या पिढीतील अभिनेत्यांचं युग आलं. या युगातला कपूर घराण्यातला पहिला अभिनेता म्हणजे राज कपूर पुत्र रणधीर कपूर. १९७१चा *कल आज और कल* हा त्याचा पहिला चित्रपट. पहिल्याच चित्रपटात तो नायक व दिग्दर्शक म्हणून उभा राहिला आणि या चित्रपटात आजोबा पृथ्वीराज व वडील राज कपूर यांच्यावरोबर भूमिका करीत असताना त्यांना दिग्दर्शन देण्याचं भाग्यदेखील त्याला लाभलं. राज कपूरने रणधीरला नायक व दिग्दर्शक म्हणून ब्रेक देण्यापूर्वी लेख टंडन यांच्या हाताखाली उमेदवारी करायला लावली. तेव्हा घरची गाडी असली तरी लोकल व बसमधूनच तो स्टुडिओत जायचा. *हिना* चित्रपट राज कपूरचं स्वप्न होतं. राजच्या मृत्यूनंतर त्याचं हे स्वप्न रणधीरने पूर्ण केलं.

राज कपूरने भोळ्याभाबड्या नायकाची आपली एक प्रतिमा येथे निर्माण केली होती. हीच प्रतिमा पकडून रणधीरने *रामपूर का लक्ष्मण*, *पोंगा पंडित*, *आज का महात्मा*, *ढोंगी*, *मामा भांजे*, *हमराही*यासारख्या काही चित्रपटांत चांगलं यश मिळवलं. १९७४ साली त्याचा एक चित्रपट आला होता *हाथ की सफाई*, १९५९ साली राज कपूरचा एक चित्रपट आला होता *दो उस्ताद*. *हाथ की सफाई*, *दो उस्ताद*चा रिमेक होता. आणि *दो उस्ताद*मधील राज कपूरची भूमिकाच *हाथ की सफाई*मध्ये रणधीरने केली होती. *रामपूर का लक्ष्मण*नंतर त्याच्या पदरी बऱ्यापैकी यश पडलं होतं. अमिताभच्या अँग्री यंग मॅनच्या युगात रणधीर *कस्मेवादे*, *पुकार* या दोन चित्रपटांत अमिताभसमोर देखील ठामपणे उभा राहिला. तरी त्याचं एकूण व्यक्तिमत्त्व अँग्री यंग मॅनच्या नायकाच्या चौकटीत बसण्यासारखं नसल्यामुळे फार मोठं यश काही त्याला लाभलं नाही. *हरजाई* चित्रपटाद्वारा त्याच्या नायकाचा येथे शेवट झाला. रणधीर कपूरपाठोपाठ कपूर घराण्यातील नंबर थ्रीच्या पिढीतील आणखी एक अभिनेता चित्रपटात आला ऋषी कपूर. राज कपूरच्या *श्री ४२०* चित्रपटातील 'प्यार हुआ इकरार हुआ...' गाण्यातील 'रहेंगी अपनी निशानिया...' या ओळीवर पडद्यावर दिसणारी तीन लहान मुलं आजही अनेकांना आठवत असतील. या तीन मुलात राज कपूरची कन्या रिमा होती. आणि तिच्याबरोबर रणधीर व ऋषी. रणधीर त्यानंतर कोणत्याच चित्रपटात बालकलाकार म्हणून कधी दिसला नाही. ऋषी कपूरने मात्र *मेरा नाम जोकर*मध्ये छोट्या राज कपूरची भूमिका करून आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात केली आणि आर.के.च्या *बॉबी*त तो सर्वात प्रथम नायक बनला. या पहिल्याच भूमिकेसाठी त्याला १९७३चं सर्वश्रेष्ठ नायकाचं फिल्म-फेअर पारितोषिक मिळालं. त्याचं व्यक्तिमत्त्वही तसं अँग्री यंग मॅनच्या नायकाच्या चौकटीत कोठेही बसण्यासारखं नव्हतं, ही गोष्ट त्याने स्वतःदेखील ओळखली असावी. यामुळे शशी कपूरच्या पावलावर पाऊल टाकून त्याने मल्टी स्टार कास्ट चित्रपटातील अनेक कलावंताच्या गर्दीत स्वतःला सामावून घेतलं. अनेक नायकांबरोबर तो चमकला, मल्टी स्टार कास्ट चित्रपटातील कलावंतांच्या गर्दीत स्वतःला हरवू न देता. ऋषीला ब्रेक देणारा *बॉबी* हा पहिला चित्रपट नायिकाप्रधान होता. तरीही या चित्रपटातून त्याने यश मिळवलं. त्यानंतर *तवायफ*, *नगिना*, *चांदणी*, *हिना*, *दामिनी*, *प्रेमरोग*, *साहिबाँ* यासारख्या नायिकाप्रधान चित्रपटांतून बिनदिक्कतपणे भूमिका केल्या.

अँग्री यंग मॅन नायकाच्या चौकटीत रणधीरचा येथे काहीसा कोंडमारा झाला. पण ऋषीने मात्र स्वतःचा असा कोंडमारा येथे होऊ दिला नाही. नायक म्हणून मागे पडल्यावर स्वतः पडद्याआड राहून आर.के.च्या *आ अब लौट चले*चं दिग्दर्शन केलं.

रणधीर व ऋषीनंतर कपूर घराण्याच्या नंबर थ्रीच्या पिढीतून चित्रपटात आलेला तिसरा अभिनेता म्हणजे राजीव कपूर. रणधीर व ऋषी या दोघांनी राज कपूरच्या आर.के.च्या चित्रपटातूनच आपल्या अभिनय जीवनाची सुरुवात केली. पण राजीव कपूरच्या रुपेरी जीवनाची सुरुवात काही आर.के.तून झाली नाही. एफ.सी.मेहरांच्या चित्रपटातून झाली. त्यांचा १९८३चा *एक जान है हम* त्याची भूमिका असलेला पहिला चित्रपट. त्याआधी १९८२ साली *प्रेमरोग* या चित्रपटाच्या वेळी तो राज कपूरचा सहाय्यक होता आणि संकलनातदेखील लक्ष घालत होता. *प्रेमरोग*चा ट्रेलर त्याने तयार केला



राजीव कपूरला लाँच करणाऱ्या आर.के.च्या *राम तेरी गंगा मैली*मध्ये मंदाकिनीसह



*बॉबी*मध्ये नायक म्हणून प्रथमच पडद्यावर चमकणारा ऋषी कपूर डिंपलसह